EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter)
Patron: Prof. R. G. Kothari
Chief Editor: Prof. Jignesh B. Patel
Email:- Mo. 9429429550 ctefeduinspire@gmail.com

# आंतरराष्ट्रीय शांती सौहार्द आणि ज्ञानाच्या प्रकाशात वसुधैव कुटुंबकम आणि जीवन विद्येचे प्रणेते वामनराव पै यांची विश्वप्रार्थना :- एक सहसंबंधात्मक अभ्यास

**संगीता प्रकाश माने**
इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालय,अमरावती

**डॉ. वंदना.स.भोयर**
इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालय,अमरावती

## सारांश

आजचे युग हे संगणकाचे डिजिटल युग आहे. सध्याच्या जागतिक समाज रचनेमध्ये विज्ञानाने भौतिक आणि तंत्रज्ञानात्मक प्रगती लक्षणीय झालेले दिसून येते. परंतु मानवी जीवन मात्र मूल्यहीनता, अशांतता, अस्थिरता, संघर्ष, असहिष्णुता यामध्येच गुरफटवून जात असताना दिसत आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर सतत स्थलांतर, युद्धजन्य परिस्थिती, दहशतवादी कारवाया, सांस्कृतिक संघर्ष, विचारांचे ध्रुवीकरण आणि आणि पर्यावरणाचा ऱ्हास इत्यादी समस्या जगापुढे आ वासून उभ्या ठाकलेल्या आहेत. परिणामी आंतरराष्ट्रीय शांतता, सौहार्द पूर्ण जीवन, सहिष्णुता, आपलेपणाची भावना विकसित झाली पाहिजे. त्यासाठी भारतीय संस्कृती व तत्त्वज्ञानातील 'वसुधैव कुटुम्बकम' ही संकल्पना संपूर्ण जगामध्ये समन्वय साधणारी आणि मानव केंद्रित विचारधारा उपयोगी पडते. त्याचबरोबर संपूर्ण विश्वाला एकात्मतेत बांधून ठेवणारी, अखिल विश्व एक कुटुंब आहे आणि जगातील प्रत्येक नागरिक आपलाच बंधू आहे आणि एकमेकांच्या सहकार्याने अवघ्या विश्वाचे कल्याण साधता यावे अशी या मागची उदात्त प्रेरणा व शिकवण आपला भारत देश संपूर्ण विश्वाला देतो. 'वसुधैव कुटुम्बकम' भारताची अमूल्य ठेवा आहे. आणि तो जपण्यासाठी भारत प्रयत्नशील असतो. वसुधैव कुटुम्बकम जगाला एकात्मतेचा संदेश देते तर आधुनिक काळातील वामनराव पै यांची जीवन विद्या त्याच विचारांचा वारसा पुढे नेण्यासाठी आणि मानवी कल्याणासाठी विश्वप्रार्थनेच्या माध्यमातून प्रत्येक व्यक्ती सुखी, यशस्वी, समाधानी झाला पाहिजे यासाठी काम करते. प्रस्तुत संशोधन लेखात विश्व मध्ये शांतता सौहार्दन आणि ज्ञानाच्या संदर्भात वसुधैव कुटुम्बकम आणि जीवन विद्या यांच्या तत्त्वज्ञानाचा व मूल्याधिष्ठीत सहसंबंधाचा सविस्तर अभ्यास करण्यात आला आहे. या सर्व अध्ययनातून असे स्पष्ट दिसून येते की अखिल विश्वातील मानवतेच्या कल्याणासाठी दोन्हीही विचारधारा परस्परांना पोषक आणि मार्गदर्शक ठरतात.

**की वर्ड्स** :-'वसुधैव कुटुम्बकम' जीवन विद्या, वामनराव पै, विश्वप्रार्थना, सहसंबंध इत्यादी.

## प्रस्तावना :-

एकविसाव्या शतक हे संगणकाचे, प्रचंड आणि अभूतपूर्व परिवर्तनाचे आहे. जागतिकीकरणामुळे भौगोलिक सीमा सीमित झाल्या जग जवळ आले पण मानव स्वतःच्या स्वार्थ, अहंकार यामध्ये गुरफटत चालला आहे. परिणामी मानवी संबंधांमध्ये दुरावा निर्माण होऊन त्यांच्यात एकमेकाबद्दल अविश्वास, गैरसमज, संघर्ष वाढताना दिसतो. जगात राजकीय स्वार्थ सामाजिक आर्थिक विषमता धार्मिक कट्टर वाद आणि सांस्कृतिक मतभेद यामुळे शांतता टिकून ठेवणे अधिकच अवघड झाले आहे. आज जगामध्ये शांतता, समन्वय, नैतिकता, मूल्याधिष्ठित शिक्षणाची आवश्यकता आहे त्यासाठी वसुधैव कुटुम्बकम आणि जीवन विद्येचे प्रणेते

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

वामनराव पै यांची विश्वप्रार्थना या दोन संकल्पना राष्ट्राला विकासाच्या, प्रगतीच्या मार्गावर नेण्यासाठी अत्यंत पोषक आणि मार्गदर्शक आहेत. भारतीय तत्त्वज्ञान हे व्यापक मानवतावादी दृष्टिकोन दर्शविते व वसुधैव कुटुम्बकम या संकल्पनेच्या माध्यमातून मानवी एकात्मतेचा अनमोल विचार प्रतिबिंबित होतात. तर वामनराव पै यांची विश्वप्रार्थना त्या मानवी एकात्मतेला नैतिकतेचे आणि भावनिकतेचे अधिष्ठान प्राप्त करून देते. या दोन विचार प्रवाहांचा सहसंबंध समजून घेऊन आंतरराष्ट्रीय स्तरावर शांती, सौहार्द सहिष्णुता, ज्ञानाच्या प्रकाशात 'वसुधैव कुटुंबकम' आणि विश्व प्रार्थना कशी वैचारिक दिशा देते याचा शोध घेण्याचा प्रयत्न होय.

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

'वसुधैव कुटुम्बकम' या संकल्पनेचे तत्वज्ञान व सामाजिक आशय स्पष्ट करणे.

जीवन विद्या तत्त्वज्ञानाच्या माध्यमातून वामनराव पै यांच्या विश्वप्रार्थनेचे स्वरूप व उद्देश समजून घेणे.

आंतरराष्ट्रीय शांतता सौहार्द आणि ज्ञानाच्या संदर्भात या दोन विचार प्रवाहांची साम्य स्थळे शोधणे.

प्रस्तुत दोन्हीही विचारधारांची समाजोपयुक्तता तपासणे.

**संशोधन पद्धती :** प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे प्राथमिक स्त्रोतामध्ये वामनराव पै यांचे अनेक ग्रंथ व जीवन विद्या मिशनचे साहित्य तर द्वितीय स्तोत्रामध्ये संबंधित तत्त्वज्ञानावर आधारित सामाजिक आणि मूल्याधिष्ठित ग्रंथ, संशोधन लेख आणि जीवन विद्येचा 'दीपस्तंभ' या मासिकाचा,नियतकालिकांचा वापर करण्यात आला आहे.

**वसुधैव कुटुम्बकम संकल्पना अर्थ व स्वरूप :-** 'वसुधैव कुटुंबकम' ही संकल्पना मुळातच भारतीय तत्त्वज्ञानातून जन्माला आलेली आहे पृथ्वीतलावर अस्तित्वात असलेली अखिल मानव जात आहे ती समस्त एकाच कुटुंबातील सदस्य आहेत म्हणजेच यातूनच विश्वबंधुत्वाची उदात्त भावना निपजते. सर्व मनुष्यप्राणी कसल्याही प्रकारचा भेदभाव न करता सर्वांच्या मनाचा विचारांचा आदर करणे परस्परांना समजून घेणे आणि एकमेकांच्या विकासासाठी कल्याणासाठी प्रयत्नशील राहणे इत्यादी गोष्टींचा समावेश या विश्वबंधुत्वाच्या संकल्पनेमध्ये प्रतीत होतो. वसुधा म्हणजे वसुंधरा पृथ्वी, धरा, माता, आणि कुटुंबकम म्हणजे समस्त पृथ्वी हे एकच कुटुंब आहे असा विशाल दृष्टिकोन या संकल्पनेतून गर्भित अर्थ दिसून येतो. भारतीय तत्त्वज्ञानात्मक महान ग्रंथ महा उपनिषद या ग्रंथात याचा उल्लेख आढळतो तो खालील प्रमाणे-अयं निज: करो वेती गणना लघुवेत्त साम् |ऋउदारचरितानां तू वसुधैव कुटुम्बकम|

वरील श्लोकातून असा अर्थ समजतो की 'आपला' आणि 'परका' असा भेदभाव करणारी माणसे संकुचित वृत्तीची असतात ते सुद्धा पुरता विचार करतात आणि आपल्या शहाणपणाचा उपयोग करत नाहीत पण जी माणसे उदारमतवादी असतात इतरांना समजून घेऊन सर्वांना समान दर्जाची वागणूक देतात त्यांना समस्त पृथ्वी एक कुटुंब आहे आणि ते सर्वांना आपलेच भाऊबंद समजून परस्परांच्या कल्याणासाठी मदतीचा हात देतात. वसुधैव कुटुम्बकम ही संकल्पना जात-धर्म भाषा राष्ट्रीय सर्व भेदांना बाजूला सारते आणि ती माणसाला माणूस म्हणून बघण्याची वागण्याची दृष्टी देते व सर्वांना आपले मानून उदात्त भावना प्रस्तुत करते. तसेच मानवी एकात्मता, बंधुता, समता, परस्परांचे सह अस्तित्व स्वीकारणे आणि सर्वांबद्दल करुणा जागृत करणे इत्यादी जीवनमूल्ये विश्वबंधुत्वाचे संकल्पनेत आपल्याला दिसून येतात. तसेच वामनराव पै सुद्धा त्यांच्या जीवन विद्येच्या ज्ञानातून कुटुंब, समाज, राज्य, राष्ट्र आणि विश्व यांच्या सहकार्यामुळेच अखिल मानव जातीचे जीवन सुखी समाधानी यशस्वी होण्यासाठी मदत होते असा विश्वास व्यक्त करतात. मुळातच भारताच्या परराष्ट्रीय नीतीच्या पंचशीला मध्ये जागतिक स्तरावर परस्परांचे सह अस्तित्व, परस्पर सहकार्य आणि विश्वबंधुत्व याला प्राधान्य देण्यात आलेले आहे.

**वामनराव पै यांचे जीवन विद्या तत्त्वज्ञान :-** वामनराव पै हे आधुनिक काळातील थोर समाज सुधारक, तत्त्वज्ञ, विचारवंत असून जीवन विद्येच्या तत्वज्ञानामधून मानवी जीवनाचा समग्र विचार मांडला आहे. या विचाराचा केंद्रबिंदू मानव

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

असून विश्वातील प्रत्येक व्यक्ती, सुखी, समाधानी यशस्वी झाली पाहिजे त्यासाठी व्यक्ती समाजाने विश्व यांच्यामध्ये सुसंवाद साधला पाहिजे ही आत्मिक तळमळ आणि विशाल दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून वामनराव पै यांनी जीवन विद्येचे तत्त्वज्ञान जगासमोर मांडले. जीवन विद्या म्हणजे "वास्तव वादाच्या आधिष्ठानावर, प्रयत्न वादाची कास धरून, विकास वादाकडे झेप घेणे होय."लोकांचे अज्ञान, अंधश्रद्धा, दैववादावर विसंबून राहण्याची सवय, बुवाबाजी वर असलेला विश्वास, निराशावाद नाहीसा करून त्यांना सुख, समृद्धी, शांती, यश मिळवून देण्यासाठी अविरतपणे समाज प्रबोधनाचे कार्य आपल्या प्रवचनांच्या माध्यमातून वामनराव पै यांनी केलेले दिसून येते. "हे जग सुखी व्हावे व आपले राष्ट्र सर्वार्थाने सर्व राष्ट्रांच्या पुढे प्रगतीपथावर जावे." हा संकल्प वामनराव पै यांनी मांडला. जीवन विद्येचे तत्त्वज्ञान 'तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार' या विचारांभोवतीच फिरते. या तत्त्वज्ञानामुळे वास्तवतेचे भान, प्रयत्नाचे महत्त्व ओळखून विकासाचे ध्येय कसे गाठायचे? याबद्दलची शिकवण मिळते. तसेच मानवी मूल्यांची जाणीव, सामाजिक जबाबदारी, तर्कशुद्ध व विवेक पूर्ण आचरण आणि ज्ञानावर आधारित असलेली जीवनशैली यांचे महत्त्व अधोरेखित करते. जीवन विद्या सांगते की, मानवाने विज्ञानाच्या जोरावर भौतिक प्रगती तर केली आहेच पण त्याचबरोबर त्याला नैतिक, बौद्धिक आणि अध्यात्मिक विकासही साधता आला पाहिजे.

**वामनराव पै यांची विश्वप्रार्थना :-** अखिल मानव जातीचे कल्याण साधण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने सर्वांशी शुभ बोलावे, शुभ इच्छा करावेआणि शुभचिंतन करावे आणि सर्वांचं भलं व्हावं. या उदात्त हेतूने वामनराव पै यांनी विश्वप्रार्थनेची निर्मिती केलेली आहे. ते पुढे असे म्हणतात की "विचाराकडून आपण पुढे सरकत सरकत आचारापर्यंत जातो." "mind moves from thought to things."

या उदात्त हेतूने वामनराव पै यांनी विश्वप्रार्थनेची निर्मिती केलेली आहे. प्रार्थना म्हणजे काहीतरी साध्य करण्याच्या हेतूने एखाद्या कल्पनेची निर्मिती करणे.आत्म्याची मनापासूनची इच्छा म्हणजे 'प्रार्थना' व्यक्तीच्या सखोल दडलेल्या गरजेतून ती प्रार्थना निर्माण होते.आयुष्यात तुम्हाला काय हवं आहे हे त्यातून स्पष्ट होते. विश्वप्रार्थनाही पारंपारिकता, धार्मिकता यांच्या पलीकडे जाणारी मानवतावादी अभिव्यक्ती आहे. यातून फक्त विश्वाच्या कल्याणाचीच भावना अभिव्यक्त होते. विश्वप्रार्थना गरिबांना वरदान ठरते कारण जीवन विद्या जे ज्ञान देते त्यासाठी कुठल्याही प्रकारचा मोबदला घेत नाही. ज्याप्रमाणे गळक्या बादलीत कितीही पाणी भरले तरी ती बादली रिकामीच राहते. त्याचप्रमाणे गरिबांच्या संसारात सुद्धा अनेक समस्या असतात. त्यात अनेक प्रकारची दारू, गुटखा, तंबाखू अशी व्यसने असतात परिणामी आरोग्य बिघडते परंतु ते डॉक्टरांकडे न जाता बुवाबाजी, भगत, देवऋषी यांच्याकडे जाऊन भरमसाठ खर्च करतात. अज्ञानामुळे अनेक मुलांना जन्माला घालतात. त्यामुळे स्त्रियांची प्रकृती ढासळते आणि मुलांना धड दोन वेळेचे जेवण आणि अंगावर कपडे सुद्धा घालायला मिळत नाहीत. अशा अनेक समस्या असतात त्या सोडवण्यासाठी किती पैसा मिळवला तरी तो अपुराच पडतो. हे सहज लक्षात येते. पण दारिद्र्याने पडलेल्या अज्ञानी लोकांना याची जाण नसते. पण या समस्या सोडवण्यासाठी जीवनविद्या मिशन चांगले ज्ञान देते, चांगली संगत मिळवून देते, चांगल्या विचारांच्या लोकांची संगत मिळाल्याने अंधश्रद्धा नाहीशी होते, मर्यादित संततीचे महत्त्व कळते, आरोग्य सुधारते, मुलांना चांगले शिक्षण मिळू शकते. शरीराला घातक असलेल्या अनेक व्यसनांपासून मुक्ती मिळते. परिणामी सांपत्तिक स्थिती सुधारते व जीवन सुखी व यशस्वी बनते. आणि विश्वप्रार्थनेची गोडी लावते आणि या विश्वप्रार्थनेमुळे विचार करण्याची पद्धत पूर्णपणे सुधारते. आणि विश्वप्रार्थना म्हणण्यासाठी वेळ वाया जात नाही किंवा कोणतेही कष्टही लागत नाहीत. वामनराव पै सांगतात की तुम्ही विश्वप्रार्थना रिकामपनी म्हणा. कारण 'रिकामे डोके सैतानाचे घर' या उक्तीप्रमाणे मनुष्य कितीतरी नकारात्मक विचार करून आपला वेळ आणि ऊर्जा खर्च करतो. तेव्हा मनातील वाईट विचार बाजूला सारण्यासाठी सतत विश्वप्रार्थनेचे चिंतन करायला वामनराव पै सांगतात. श्रीमंतांना आधार आहे म्हणजे व्यक्तीला जे सुख, शांती, समाधान, आनंद हवा असतो तो पैसा, शक्ती यांच्या बळावर मिळू शकत नाही. पैसा मिळवण्यासाठी त्याने मोठ्या प्रमाणात व्याप वाढवलेला असतो आणि त्याबद्दल त्यांच्या मनात काळजी चिंता, भीती, मनस्ताप असतो. मनातील तणाव कमी करण्यासाठी आणि मनःशांती लाभण्यासाठी विश्वप्रार्थनाही

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

रामबाण उपाय ठरू शकते. पण जीवन विद्या ही एक जीवन जगण्याची कला आहे. हे जीवन विद्येचे ज्ञान आत्मसात केल्यानंतर विश्वातील प्रत्येक व्यक्तीला सुख समाधान लाभते, असा विश्वास वामनराव पै व्यक्त करतात. व विश्वाला उपयुक्त असून ती धर्मातीत आहे ती सर्वधर्मसमभाव आहे.वैश्विक आणि शाश्वत आधार असलेली अमूल्य अशी विश्वप्रार्थना सांगितली. पुढे वामनराव पै म्हणतात की "तुम्ही इतरांना जे सुख द्याल तेच सुख बूमरैंग होऊन तुमच्यावर सुखाचा अभिषेक करेल" विश्वप्रार्थनाही इतरांना सुखी करण्याचा अत्यंत सोपा मार्ग आहे क्रिया तशी प्रतिक्रिया यांनी निसर्गाच्या नियमाप्रमाणे विश्वप्रार्थनेच्या सतत चिंतनाने व्यक्तीचे मानसिक परिवर्तन घडून येते. परस्परांमध्ये सहकार्याची भावना वाढीस लागते इतरांशी संबंध सुधारतात जीवनाकडे पाहण्याची दृष्टी सकारात्मक होते परिणामी व्यक्ती स्वतः सुखी होऊन इतरांनाही सुख आनंद देण्याचा प्रयत्न करतो. विश्वप्रार्थना ही सुंदर विचारांनी भरलेली व भरलेली आहे. ती कुठेही वंश, धर्म, पंथ, प्रांत, सांप्रदाय,धार्मिकता यामध्ये अडकलेली नाही ही विश्वप्रार्थना कुठेही कधीही केव्हाही कशीही म्हणू शकतो याला कुठल्याही प्रकारची बंधने नाहीत आणि या विश्व प्रार्थना मध्ये अखिल विश्वातील मानव जातीचे कल्याणच इच्छिलेले दिसून येते. विश्वप्रार्थना ही नामस्मरणापेक्षा सुद्धा श्रेष्ठ आहे कारण नामस्मरणामध्ये व्यक्ती फक्त स्वतःच्या स्वार्थासाठी नामजप करत असतो. पण विश्वप्रार्थने मध्ये प्रार्थना करणारा व्यक्ती संकुचित वृत्तीने स्वतःसाठी न मागता विशाल दृष्टिकोन ठेवून इतर लोकांचे कल्याण व्हावे भले व्हावे यासाठी प्रार्थना करत असतो. ज्याप्रमाणे संत ज्ञानेश्वरांनी विश्वात्मक देवाला पसायदानाच्या माध्यमातून विश्वातील लोकांसाठी मागणी मागितलेले आहे. त्यात ते म्हणतात की, "जे खळांची व्यंकटी सांडो" येथे ज्ञानेश्वर महाराज नकारात्मकतेतून सकारात्मकतेकडे घेऊन जाताना दिसतात कारण त्यांनी 'खल' म्हणजे दुष्ट प्रवृत्तीची माणसे नष्ट करा असे न सांगता त्यांची वाईट प्रवृत्ती नाहीशी झाली पाहिजे. एकमेकांचा द्वेष तिरस्कार न करता प्रत्येक व्यक्तीला त्याची प्रवृत्ती सुधारण्यासाठी मदत करणे यातच विश्वबंधुत्वाची पाळेमुळे खोल रुजलेली दिसतात. विश्वप्रार्थने मध्ये वामनराव पै यांनीही संत ज्ञानेश्वरांच्या चांगल्या विचारांची जोपासना केली आहे आणि म्हणूनच त्यांनी सुद्धा या विचारधारेला आधुनिक मानसशास्त्राची जोड दिलेली आहे. विश्वप्रार्थने मध्ये कुठल्याही प्रकारची नकारात्मकता दिसून येत नाही त्यात सर्व शब्द हे सकारात्मकच वापरण्यात आलेले आहेत. त्यांनी सर्वांना चांगली बुद्धी मिळावी अशीच सकारात्मक मागणी केलेली दिसून येते परिणामी "सकारात्मक आणि सहकारात्मक विचारातूनच शरीरामध्ये चांगली अँटीबॉडीज तयार होतात." अशा प्रकारचे मत प्रल्हाद पै आपल्या वेबिनार्स मधून मांडतात. तसेच नामस्मरणामध्ये विश्वप्रार्थना नाही तर विश्वप्रार्थनेमध्ये नाम आहे. त्यामुळे विश्वप्रार्थनाही परिपूर्ण आहे असे दिसून येते. विश्वप्रार्थनाही हृदयामध्ये स्थित असलेल्या ईश्वराला किंवा चेतनेला उद्देशून असल्यामुळे ती सर्वातिल सर्वेश्वराच्या अनुसंधानात केल्यामुळे विश्वप्रार्थनाही सर्वव्यापक अशी दिसून येते. आणि विश्वाच्या कल्याणासाठी केली जाते. वामनराव पै यांच्या मते, नामस्मरण करताना राम, कृष्ण, विठ्ठल अशा वेगवेगळ्या मूर्तींचे अधिष्ठान असते. त्यामुळे जगात एखाद्या विशिष्ट देवा विषयी वादंग निर्माण झाले असते पण विश्वप्रार्थनाही व्यापक दृष्टिकोन देते तसेच विश्वप्रार्थनेला विश्वरूपी निसर्ग नियमांचे अधिष्ठान आहे. संपूर्ण जग सुखी होण्यासाठी विश्वप्रार्थना मदत करत आहे. अशाप्रकारे विश्वप्रार्थने मधील मुख्य आशय पुढील प्रमाणे : अखिल मानव जातीमध्ये एकात्मतेची भावना, अज्ञान, अंधश्रद्धा यातून बाहेर पडण्यासाठी शहाणपणा या जीवन मूल्यांचा उपयोग तर्क शुद्ध ज्ञान, विवेक आणि परस्परांबद्दल करुणा सुख, शांती, आनंद, यश, सहिष्णुता आणि सौहार्दाचे वातावरण निर्मिती करणे. अशाप्रकारे वरील विवेचनावरून असे दिसून येते की, विश्वप्रार्थनाही जीवन विद्येच्या तत्त्वज्ञानाची सर्जनशील अभिव्यक्ती ठरते.

**आंतरराष्ट्रीय शांती व सौहार्द :** जागतिक स्तरावर शांततामय सहजीवनासाठी भारत नेहमीच कटिबद्ध आहे. त्यांनी आपल्या वसुधैव कुटुम्बकम या संकल्पनेच्या माध्यमातून सर्व जगाला शांतीचा संदेश देतो. भारत कधीही कोणत्याही देशाच्या अंतर्गत शांततेमध्ये हस्तक्षेप करणार नाही. यांचा उल्लेख भारताच्या परराष्ट्रीय धोरणामध्ये आढळतो. राष्ट्र राष्ट्रांमध्ये युद्ध जन्य परिस्थिती नसणे म्हणजेच आंतरराष्ट्रीय शांतता नव्हे तर त्यात परस्परांवर असलेला विश्वास सहकार्याची भावना आणि सुसंवादाची प्रक्रिया होय. आणि सौहार्द म्हणजे प्रत्येक धर्म, संस्कृती, विचार यांचा परस्पर आदर राखण्याची क्षमता होय.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

म्हणजेच भारताने नेहमीच सहिष्णुतेची भावना बाळगली. मानवी जाणीवांच्या उत्क्रांतीमध्ये सहिष्णुता जीवन मूल्याचे सर्वोच्च स्थान आहे. सहिष्णुतेचा जन्म अद्वेताच्या जाणिवेतून होतो. भारतीय सहिष्णुतेच्या जवळ आणखी कोणत्याही देश, धर्माची विचारधारा अजून पोचलेली नाही. आता कुठे थोडीफार युनायटेड नेशन्स मध्ये त्यांच्या चार्टरमध्ये mutual respect शब्दांचा समावेश केलेला आहे. त्यांनी कोणत्याही धर्माला कमी लेखले नाही किंवा कोणत्याही धर्माचा तिरस्कार, अनादर केला नाही. जसा माझा धर्म श्रेष्ठ आहे तसा प्रत्येकाचा धर्म श्रेष्ठ आहे हीच भावना भारताने सतत अधोरेखित केलेली आहे. आजच्या काळात वैश्विक समाजात शांतता टिकून ठेवण्यासाठी प्रत्येक तरुणाला मूल्याधिष्ठित शिक्षण मिळाले पाहिजे, मानवी हक्कांची जाणीव, माणसाला माणूस म्हणून पाहण्याची वृत्ती म्हणजेच करुणा, संवाद प्रधान संस्कृती आणि नैतिकता आत्मसात करून ती आचरणात आणणे इत्यादी सर्व घटकांशी वसुधैव कुटुंबकम आणि विश्वप्रार्थना यांचा अगदी जवळचा संबंध आहे.

## वसुधैव कुटुम्बकम आणि विश्वप्रार्थना : सहसंबंधात्मक विश्लेषण

**मानवता या मूल्याचे सार्वत्रिकीकरण :** दोन्ही विचारधारा धर्म म्हणजे फक्त हिंदू, बौद्ध, ख्रिश्चन असा भारतीय अर्थ नाही धर्म म्हणजे जो पकडून ठेवतो धारण करतो किंवा न्याय,नीती, कर्तव्य यांच्याशी जोडतो. अशी भारतीय तत्त्वज्ञानात धर्माची व्याख्या आढळते. तसेच भारतीय संस्कृती माणसाला माणूस म्हणून स्वीकृती देते. अशाप्रकारे धर्म, संस्कृती व राष्ट्र यांच्या सीमा ओलांडून परस्पर सहकार्य करून वैश्विक स्तरावर मानवतेचा पुरस्कार करतात.

**अहिंसा व सह अस्तित्व :** परस्परांमध्ये संघर्ष निर्माण करणे ऐवजी संवाद घडवला पाहिजे त्यासाठीच जागतिकीकरणामुळे जग जवळ आले आणि एकमेकांच्या सहकार्यामुळे परस्परांच्या गरजा भागवता येऊ लागल्या त्यातूनच सह अस्तित्वाचा पुरस्कार या दोन्हीही विचारसरणीतून दिसून येतो.

**ज्ञानाधिष्ठित शांती :-** अज्ञानामुळे संघर्षाचे बीजे रोवली जातात परंतु त्याला ज्ञान, विवेक व शहाणपणाच्या माध्यमातून शांतता साधण्यावर भर दिला जातो.

**विश्व कल्याणाची भावना :-** दोन्हीही विचार प्रवाह स्व कडून समष्टीकडे नेतात येथे मी आणि माझे यासाठी काहीही मागणं मागितलेले नाही. विश्वप्रार्थनीतही सर्वांना, सर्वांचे अशा आपलेपणाच्या शब्दांचा वारंवार वापर होताना दिसतो. वसुधैव कुटुम्बकम तेव्हाच निर्माण होते जेव्हा व्यक्ती प्रार्थनेतही स्वतःचा स्वार्थ विसरून विश्वाचा विचार करते. अशा प्रकारे आंतरराष्ट्रीय स्तरावरील युनेस्को, युनिसेफ, अशा संस्था मानवी सहजीवनासाठी व शांततेसाठी प्रयत्नशील आहेत. ही महायुद्धाची परिस्थिती बदलण्यासाठी, शांतता निर्माण करण्यासाठी स्थापन झालेल्या दिसून येतात. विश्वबंधुत्वाची संकल्पना आणि विश्वप्रार्थना समाजकार्य शिक्षण आंतरराष्ट्रीय संबंध आणि पर्यावरणीय संरक्षणासाठी प्रेरणादायी व मार्गदर्शक ठरतात.

**निष्कर्ष :-** प्रस्तुत संशोधनातून असे स्पष्ट होते की, भारतीय तत्वज्ञानातील शाश्वत व सार्वत्रिक मूल्याधिष्ठित संकल्पना म्हणजे 'वसुधैव कुटुंबकम'या विचारधारेकडे पाहिले जाते तर वामनराव पै यांची विश्वप्रार्थना ही तिची आधुनिक मानव केंद्रित आणि व्यवहारात्मक, सकारात्मक अभिव्यक्ती आहे. विश्वप्रार्थनाही लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांना समजते रोजच्या जगण्यात सहज उतरवता येते वामनराव पै यांनी विश्वबंधुत्वाला 'कठीण तत्त्वज्ञानातून' बाहेर काढून 'सोप्या आचरणा'त आणले. विश्वप्रार्थना ही 'वसुधैव कुटुम्बकम' या संकल्पनेचे आधुनिक वैज्ञानिक व उपयोजित रूप आहे. विश्वप्रार्थना आणि विश्वबंधुत्वाची संकल्पना ही सौहार्दानी ज्ञानाच्या प्रसारासाठी परस्पर पोषक असून मानवी मूल्याधिश्चित समाज रचना बनविण्यासाठी हा वैचारिक संगम भविष्यात दिशादर्शक ठरू शकतो.

**संदर्भसूची :-**

उपनिषद संग्रह, महोपनिषद.

रानडे, आर. डी. 'भारतीय तत्त्वज्ञानाचा इतिहास'

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

डॉ. मर्फी, जोसेफ.' तुमच्या अबोध मनाचं सामर्थ्य,'(भाषांतर डॉ. नांदापूरकर फडके, शुचिता.) फिंगरप्रिंट्स पब्लिशिंग,

पै, वामनराव. 'क्रांतिकारक जीवनविद्या दृष्टिक्षेपात', जीवन विद्या फाउंडेशन प्रकाशन, मुंबई.

पै, वामनराव. 'संकल्प सिद्धी चे गुपित 'विश्वप्रार्थना', जीवन विद्या फाउंडेशन प्रकाशन, मुंबई.

पै, वामनराव. 'तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार' जीवन विद्या फाउंडेशन प्रकाशन, मुंबई.

पै, वामनराव. 'तुमचे भाग्य तुमच्या विचारात', जीवन विद्या फाउंडेशन प्रकाशन, मुंबई.